# प्रकरण ६ कार्यकारी मंडळ

- प्रस्तावना
- केंद्रीय कार्यकारी मंडळ
- राष्ट्रपती
- राष्ट्रपती अधिकार व कामे
- उपराष्ट्रपती
- उपराष्ट्रपती अधिकार व कार्ये
- पंतप्रधान
- पंतप्रधान अधिकार व कार्ये
- मंत्रिमंडळ
- मंत्रिमंडळ अधिकार व कार्य
- घटक राज्य कार्यकारी मंडळ
- राज्यपाल
- राज्यपाल अधिकार कार्य व भूमिका
- मुख्यमंत्री
- मुख्यमंत्री अधिकार व कार्य
- मंत्रिमंडळ
- मंत्रिमंडळ अधिकार व कार्य
- सारांश

- **प्रस्तावना**

लोकशाहीत कायदेमंडळाबरोबर प्रत्यक्ष राज्यकारभार चालविणारे कार्यकारी मंडळही तितकेच महत्त्वाचे असते. संसदीय शासन पद्धतीत राष्ट्रपती, पंतप्रधान आणि मंत्रिमंडळ यांचे मिळून केंद्रीय कार्यकारी मंडळ बनते, तर राज्यपाल, मुख्यमंत्री व मंत्रिमंडळ यांचे मिळून घटक राज्याचे कार्यकारी मंडळ बनते. नामधारी आणि वास्तविक असे दोन कार्यकारी प्रमुख या प्रकारात असतात. केंद्रीय स्तरावर राष्ट्रपती हे नामधारी कार्यकारी प्रमुख असून पंतप्रधान आणि मंत्रिमंडळ हे वास्तविक कार्यकारी प्रमुख आहेत. घटक राज्यात राज्यपाल हे नामधारी कार्यकारी प्रमुख असून मुख्यमंत्री व मंत्रिमंडळ हे वास्तविक कार्यकारी प्रमुख आहेत. याचाच अर्थ संसदीय लोकशाही शासन पद्धतीत नामधारी व वास्तविक असे दोन कार्यकारी प्रमुख असतात.

- **कार्यकारी मंडळ**

देशाचा किंवा घटक राज्याचा प्रत्यक्ष राज्यकारभार पाहणाऱ्यांना कार्यकारी मंडळ म्हणतात.

- **केंद्रीय कार्यकारी मंडळ**

राष्ट्रपती, पंतप्रधान आणि मंत्रिमंडळ यांचे मिळून केंद्रीय कार्यकारी मंडळ बनते.

- **राष्ट्रपती**

राष्ट्रपती हे नामधारी व घटनात्मक कार्यकारी प्रमुख असतात. देशाचा संपूर्ण राज्यकारभार हा राष्ट्रपतीच्याच नावे चालतो; पण खरी सत्ता मात्र पंतप्रधान आणि मंत्रिमंडळ यांच्याच हाती असते. पंतप्रधान आणि मंत्रिमंडळ यांच्या सल्ल्याने राष्ट्रपती कारभार करतात.

भारतात राष्ट्रपती हे निवडणुकीने पदावरती येतात. वंशपरंपरेने भारताचे राष्ट्रपती पदावरती येत नाहीत.

राष्ट्रपती हे जरी नामधारी असले तरीही त्यांना स्वविवेकाधिकाराचा वापर करता येतो.

**राष्ट्रपती पदाच्या पात्रतेच्या अटी:**

१. ती व्यक्ती भारताची नागरिक असावी.

२. वय वर्ष ३५ पूर्ण असावे.

३. सरकारी नोकरीमध्ये असता कामा नये.

४. केंद्र व राज्याच्या कायदेमंडळाच्या कोणत्याही सभागृहाची सदस्य असता कामा नये. असल्यास सदस्यत्वाचा राजीनामा द्यावा लागतो.

## निवडणूक पद्धत:

राष्ट्रपती पदाच्या निवडणुकीसाठी प्रमाणशीर क्रमदेय मतदान पद्धतीचा अवलंब केला जातो. ही निवडणूक अप्रत्यक्ष असते. राज्यसभा, लोकसभा त्याचबरोबर विधानसभा यातील केवळ निवडून आलेल्या सदस्यांना राष्ट्रपती निवडणुकीत मतदान करता येते. मतदार मतदान करताना पसंतीक्रम देतात. उमेदवाराला निवडून येण्यासाठी आवश्यक संख्येएवढी मते मिळवावी लागतात. त्यास कोटा असे म्हणतात.

एकूण मतांची संख्या +१
…………………..= कोटा
निवडायच्या प्रतिनिधींची संख्या + १

## कार्यकाळ

राष्ट्रपतींची मुदत पाच वर्षांची असते. मुदतपूर्व राष्ट्रपती आपल्या पदाचा राजीनामा देऊ शकतात.

## महाभियोग

राष्ट्रपतींना पदावरून हटविण्यासाठी महाभियोग प्रक्रिया राबवावी लागते. संसदेच्या कोणत्याही सभागृहात महाभियोग ठराव मांडता येतो. ठराव मांडण्यापूर्वी राष्ट्रपतींना चौदा दिवस अगोदर पूर्वसूचना द्यावी लागते. दोन्ही सभागृहांतील ठरावावर चर्चा होऊन दोन तृतीयांश बहुमताने ठराव मंजूर झाल्यास राष्ट्रपतींना पदावरून दूर व्हावे लागते. भारतात आजपर्यंत कोणत्याही राष्ट्रपतींवर महाभियोग चालविला गेला नाही.

# राष्ट्रपतींचे अधिकार व कार्ये -

## कार्यकारी अधिकार

राष्ट्रपती, पंतप्रधान व त्याच्या मंत्रिमंडळाची नेमणूक करत असतात. पंतप्रधान व त्याच्या मंत्रिमंडळाला राज्यकारभाराची शपथ देतात. केंद्रशासित प्रदेशांचा सर्व कारभार राष्ट्रपतीमार्फत चालतो.

## नेमणूकविषयक अधिकार

प्रशासन चालविण्यासाठी विविध महत्त्वाच्या पदांवरील नेमणुका राष्ट्रपती करत असतात. यामध्ये घटक राज्यांचे राज्यपाल, महालेखापाल, सर्वोच्च व उच्च न्यायालयाच्या न्यायाधीश, वित्त आयोग, निवडणूक आयोग अध्यक्ष व सदस्य,महान्यायवादी, केंद्रीय लोकसेवा आयोगाचे अध्यक्ष व सदस्य, तीनही सैन्य दलांतील प्रमुख, इतर देशांतील राजदूतांना मान्यता देणे व इतर देशांत राजदूत नेमणे.

## कायदेविषयक अधिकार

राष्ट्रपती हे कायदेमंडळाचा एक महत्त्वाचा घटक आहेत. राष्ट्रपतींच्या स्वाक्षरीशिवाय याशिवाय कायदा बनू शकत नाही; पण हा अधिकार ते सरकारच्या सल्ल्यानेच वापरतात. पुढील काही अधिकार आहेत.

१. संसदेच्या दोन्ही सभागृहांची अधिवेशने बोलाविणे किंवा स्थगित करणे.

२. सार्वत्रिक निवडणुकीच्यानंतर पहिल्या बैठकीच्या वेळी राष्ट्रपती संसदेपुढे अभिभाषण करतात.

३. राष्ट्रपतींना वटहुकूम काढण्याचा अधिकार आहे.

४. दोन्ही सभागृहांमध्ये मतभेद झाल्यास संयुक्त अधिवेशन बोलविण्याचा अधिकार राष्ट्रपतींना आहे.

## आर्थिक अधिकार

अर्थविधेयक हे नेहमी राष्ट्रपतींच्या संमतीने सभागृहात मांडले जाते. प्रत्येक वर्षीचे अंदाजपत्रक राष्ट्रपतींच्या संमतीने संसदेपुढे मांडले जाते. देशाच्या संचित निधीवर राष्ट्रपतींचे नियंत्रण असते. केंद्र व घटक राज्ये यांच्यामध्ये करविषयक उत्पन्नाची विभागणी करण्यासाठी वित्त आयोगाची नेमणूक करण्याचा अधिकार राष्ट्रपतींना आहे. तसेच विविध खात्यांच्या खर्चाच्या मागण्यादेखील राष्ट्रपतींच्या शिफारशीने संसदेपुढे मांडता येतात.

## न्यायविषयक अधिकार

**राष्ट्रपतींच्या न्यायविषयक अधिकाराच्याबाबतीत तीन गोष्टी महत्त्वाच्या आहेत**.

१) सर्वोच्च व उच्च न्यायालयातील न्यायधीशांच्या नेमणुका राष्ट्रपती करतात.

२) राष्ट्रपती हे देशातील न्यायव्यवस्थेचे सर्वोच्च प्रमुख असल्याने त्यांना शिक्षा माफ करण्याचा किंवा आहे तशीच ठेवण्याचा अधिकार आहे.

३) राष्ट्रपतींना सर्वोच्च न्यालयाकडे कायदेशीरबाबतीत सल्ला मागण्याचा अधिकार आहे.

## आणीबाणीविषयक अधिकार

**राष्ट्रपती एकूण तीन प्रकारच्या आणीबाणी घोषित करू शकतात.**

१) राष्ट्रीय आणीबाणी (कलम ३५२)

२) घटक राज्यातील आणीबाणी (कलम ३५६ )

३) आर्थिक आणीबाणी (कलम ३६० )

## राष्ट्रपतींची भूमिका व स्थान

राष्ट्रपती घटनात्मक प्रमुख असले तरीही संसदीय परंपरेने त्यांचे पद हे नामधारी ठरते. राष्ट्रपतींचे एकूण अधिकार व कार्यांची व्याप्ती पाहता ते शक्तिशाली आहेत असे वाटू शकते. मात्र प्रत्यक्षात राष्ट्रपतींचे अधिकार नाममात्र आहेत. पंतप्रधान आणि मंत्रिमंडळाच्या सल्ल्यानेच राष्ट्रपतींना सर्व अधिकार वापरावे लागतात.

## पंतप्रधान आणि मंत्रिमंडळाच्या सल्ल्याने राज्यकारभार

भारताचा राज्यकारभार राष्ट्रपतींच्या नावे चालतो. प्रत्यक्षात राष्ट्रपती राज्यकारभार करत नाहीत. व्यवहारात पंतप्रधान आणि मंत्रिमंडळ हेच राज्यकारभार चालवितात. राष्ट्रपतींच्या सहीने प्रत्येक कायदा, ठराव, आदेश असला तरीही प्रत्यक्षात निर्णय पंतप्रधान आणि मंत्रिमंडळाकडून केला जातो.

## नकाराधिकार

नकाराधिकार म्हणजे राष्ट्रपतींनी विधेयक किती काळ आपल्याकडे ठेवावे याबद्दलची कालमर्यादा. ( राष्ट्रपती एखादे विधेयक पुनर्विचारासाठी संसदेकडे पाठवू शकतात.) राज्यघटनेत या नकाराधिकाराबद्दल कुठलाही उल्लेख नाही; पण नकाराधिकारामुळे राष्ट्रपतींचे स्थान प्रबळ बनू शकते.

## नाममात्र अधिकार

राष्ट्रपती हे नाममात्र आहेत, ते रबरी शिक्का आहेत, अशी टीका त्यांच्यावर केली जाते; पण ४४ व्या घटना दुरुस्तीने (१९७८) पंतप्रधान आणि मंत्रिमंडळाने दिलेला सल्ला राष्ट्रपती पुनर्विचारासाठी पाठवू शकतात.

## पुनर्विचाराचा अधिकार

राष्ट्रपती एखादे विधेयक, मंत्रिमंडळाचा सल्ला, सूचना पुनर्विचारासाठी पाठवू शकतात; पण पुनर्विचार करून परत पाठविलेले विधेयक, सूचना, सल्ला राष्ट्रपतींना स्वीकारावा लागतो.

## स्वविवेकाचा अधिकार

राष्ट्रपतींना स्वविवेकाधिकाराचा वापर करता येतो. १९९० च्या दशकात बदललेल्या राजकीय परिस्थितीने राष्ट्रपतींना स्वविवेकाचा अधिकार वापरता येऊ लागला. १९९६ पासून कोणत्याच एका राजकीय पक्षाला बहुमत मिळत नसल्यामुळे राष्ट्रपतींना स्वविवेकाचा अधिकार वापरता येऊ लागला. कोणत्याच एका पक्षाला बहुमत मिळाले नाही, तर बहुमत कुणाकडे आहे याचा विवेकाधिकार राष्ट्रपती करू लागले. सत्तेत असणाऱ्या पक्षाने बहुमत गमावले, तर दुसऱ्या पक्षाला संधी देणे किंवा सभागृह बरखास्त करणे, मंत्रिमंडळावर अविश्वास ठराव मंजूर झाला, तर दुसऱ्या पक्षास सरकार बनविण्यास सांगणे. आघाड्यांच्या राजकारणांच्या परिणामामुळे राष्ट्रपती नाममात्र न राहता आपल्या अधिकाराचा वापर करू लागले.

- ## उपराष्ट्रपती

राज्यघटनेच्या कलम ६३ मध्ये उपराष्ट्रपती पदाची तरतूद केली आहे. राष्ट्रपतींच्या अनुपस्थितीत उपराष्ट्रपती काम पाहतात. उपराष्ट्रपती राज्यसभेचे पदसिद्ध अध्यक्ष असतात. राज्यसभेचे कामकाज पाहणे हे त्यांचे प्रमुख काम आहे.

उपराष्ट्रपती पदासाठी आवश्यक पात्रता:

१. ती व्यक्ती भारताची नागरिक असावी.

२. वयाची ३५ वर्षे पूर्ण केलेली असावी.

३. सरकारी नोकरीवर असता कामा नये.

४. राज्यसभा सदस्य बनण्यासाठी आवश्यक असणारी पात्रता पूर्ण केलेली असावी.

## निवडणूक पद्धत

लोकसभा व राज्यसभा या दोन्ही सभागृहांतील निवडून आलेल्या सदस्यांकडून गुप्त व क्रमदेय मतदान पद्धतीने उपराष्ट्रपतींची निवड केली जाते.

## कार्यकाळ

उपराष्ट्रपती पदाचा कार्यकाळ पाच वर्षांचा असतो. स्वेच्छेने ते आपल्या पदाचा राजीनामा राष्ट्रपतींकडे देऊ शकतात. त्यांना पदच्युत केले जाऊ शकते.

## उपराष्ट्रपतींचे अधिकार व कार्ये

१. उपराष्ट्रपती हे राज्यसभेचे पदसिद्ध अध्यक्ष असतात. अध्यक्ष या नात्याने राज्यसभेची सर्व जबाबदारी, कार्ये पार पाडतात.

२. राष्ट्रपतींच्या अनुपस्थितीत अधिकार व कार्ये पार पाडणे.

३. राष्ट्रपतींच्या तुलनेत उपराष्ट्रपतींना अधिकार व कामे फारच कमी आहेत.

- ## पंतप्रधान

कार्यकारी मंडळाचे वास्तविक प्रमुख पंतप्रधान असतात. देशाचा सर्व राज्यकारभार हे प्रत्यक्षात पंतप्रधानच पाहत असतात. (कलम ७४) पंतप्रधान व मंत्रिमंडळाबाबत पुढील तरतुदी करण्यात आल्या आहेत.

१. राष्ट्रपतींना त्यांच्या कार्यात मदत व सहकार्य करण्यासाठी पंतप्रधान व मंत्रिमंडळ असेल<br>
२. राष्ट्रपती पंतप्रधानांची निवड करतील आणि पंतप्रधानांच्या सल्ल्याने इतर मंत्र्यांची निवड करतील.<br>
३. पंतप्रधान व मंत्रिमंडळ हे लोकसभेस जबाबदार असेल.

## पंतप्रधानांची निवड

लोकसभेत निवडून आलेल्या बहुमत प्राप्त राजकीय पक्षाच्या/गटाच्या नेत्याची राष्ट्रपती पंतप्रधान म्हणुन निवड करतात. निवड होणारी व्यक्ती लोकसभा व राज्यसभा या दोन्हीपैकी कोणत्याही एका सभागृहाची सदस्य असणे आवश्यक असते.

## पात्रतेच्या अटी

१. ती व्यक्ती भारतीय नागरिक असावी

२. वय वर्षे २५ पूर्ण असावे.

३. लोकसभेवर किंवा राज्यसभेवर निवडून येण्यास पात्र असावी.

## पंतप्रधानांचे अधिकार व कार्य

### मंत्रिमंडळ/संसद/सत्ताधारी पक्षाचा नेताः

पंतप्रधान हे मंत्रिमंडळाचे नेते असतात. मंत्रिमंडळाची निर्मिती करणे, मंत्र्यांना खाते वाटप करणे, खात्यांमध्ये फेरबदल करणे, खाते काढून घेणे, मंत्र्यांवर नियंत्रण ठेवणे, समन्वय ठेवणे. मंत्रिमंडळाने घेतलेले निर्णय राष्ट्रपतींना कळविणे ही कामे पंतप्रधानांना करावी लागतात. पंतप्रधान हे संसदेचे नेते असतात. संसदेचे अधिवेशन बोलाविणे व स्थगित करणे याबाबतचा सल्ला ते राष्ट्रपतींना देतात. तसेच पंतप्रधान हे सत्तारूढ पक्षाचा नेता असल्याने पक्षाच्या संबंधित कार्ये त्यांना करावी लागतात.

## मंत्रिमंडळ व राष्ट्रपती यांच्यातील दुवाः

पंतप्रधान हे मंत्रिमंडळ व राष्ट्रपती यांच्यातील दुवा म्हणून ओळखले जातात. मंत्रिमंडळाने घेतलेले निर्णय राष्ट्रपतींना कळविणे व राष्ट्रपतींनी दिलेला सल्ला किंवा निर्णय मंत्रिमंडळास कळविण्याचे काम पंतप्रधान करतात.

## मंत्रिमंडळातील दुवा:

मंत्रिमंडळात सर्व मंत्र्यांचा दर्जा हा समान असतो. सर्व मंत्र्यांमध्ये दुवा साधण्याचे काम पंतप्रधान करतात. मंत्र्यांवर नियंत्रण ठेवणे, देखरेख करणे, मंत्र्यांना मार्गदर्शन करणे ही सर्व कामे पंतप्रधानांना करावी लागतात.

## देशातील जनतेचा नेता

पंतप्रधान हे देशातील सर्व जनतेचे नेते असतात. जनतेच्या इच्छा, अपेक्षा पूर्ण करणे व जनतेचे प्रश्न सोडविण्याची जबाबदारी पंतप्रधानांची असते.

## नियुक्त्यांचा अधिकार

घटक राज्यांचे राज्यपाल, आयोगांचे अध्यक्ष व सदस्य, लष्कराचे प्रमुख, महालेखापाल, महान्यायवादी, सर्वोच्च व उच्च न्यायालयाचे न्यायाधीश, वित्त आयोग व निवडणूक आयोग यांच्या नियुक्त्या पंतप्रधानांच्या सल्ल्यानेच राष्ट्रपती करत असतात.

## परराष्ट्र संबंधित कामे

परराष्ट्र धोरण ठरविणे, परराष्ट्राशी मैत्री सहकार्य करणे, तह करणे, वाटाघाटी करणे, करार करणे, विदेश दौरा ही सर्व कामे पंतप्रधानांना करावी लागतात.

संसदीय लोकशाहीत पंतप्रधान हे सर्वांत जबाबदारीचे व शक्तिशाली पद आहे. देशातील सर्व सत्ता ही पंतप्रधानांकडे एकवटलेली असते.

- ## केंद्रीय मंत्रिमंडळ

## मंत्रिमंडळाची निर्मिती

पंतप्रधानांना त्यांच्या कार्यात सहकार्य करण्यासाठी मंत्रिमंडळ असेल, कायदेमंडळात ज्या राजकीय पक्षाला/गटाला बहुमत मिळते त्याचे मंत्रिमंडळ बनते. पंतप्रधान आपल्या मंत्रिमंडळाची यादी राष्ट्रपतींना सादर करतात. मंत्रिमंडळातील सदस्य हे कोणत्याही एका सभागृहाचे सदस्य असावे लागतात.

## मंत्रिमंडळाची रचना

२००३ सालच्या घटना दुरुस्तीनुसार मंत्र्यांची संख्या ही लोकसभेच्या एकूण सदस्य संख्येच्या १५% पर्यंत असावी अशी तरतूद करण्यात आली. मंत्रिमंडळाचे तीन प्रकारांत वर्गीकरण करता येते.

### १) कॅबिनेट मंत्री

### २) राज्यमंत्री

### ३) उपमंत्री

## १) कॅबिनेट मंत्री

सर्वांत वरच्या स्तरावर कॅबिनेट मंत्री असतात. प्रत्येक खात्याचा एक कॅबिनेट मंत्री असतो. या मंत्र्यांचा दर्जा सर्वोच्च असतो.

## २) राज्यमंत्री

कॅबिनेट मंत्र्यांनंतर दुसऱ्या स्थानावरील मंत्री म्हणजे राज्यमंत्री. कॅबिनेट मंत्र्यांना मदतीसाठी राज्यमंत्री असतात.

## ३) उपमंत्री

राज्यमंत्र्यांकडे खात्याचा कारभार जास्त असेल, तर त्यांच्या मदतीसाठी उपमंत्री दिला जातो.

सर्व मंत्र्यांच्या मदतीसाठी प्रशासनातील कायमस्वरूपी सचिव असतात.

### मंत्रिमंडळाची मुदत

संसदेचा विश्वास असेपर्यंत मंत्रिमंडळ आपल्या पदावर राहते. संसदेने मंत्रिमंडळावर अविश्वास व्यक्त केल्यास मंत्रिमंडळाला राजीनामा द्यावा लागतो. तसेच पंतप्रधानांनी राजीनामा दिला, तर मंत्रिमंडळाचा राजीनामा समजला जातो.

## मंत्रिमंडळाचे अधिकार व कार्ये

### कायदेविषयक अधिकार

वास्तविक प्रमुख असल्यामुळे मंत्रिमंडळाला कायदेनिर्मिती करावी लागते. संसदेत बहुतांश विधेयके ही मंत्रिमंडळाकडून सादर केली जातात व ती विधेयके संसदेत पास करून घेण्याचे कार्य मंत्रिमंडळ करत असते. आखलेल्या धोरणांशी सुसंगत असे कायदे तयार करण्याची जबाबदारी मंत्रिमंडळाचीच असते.

## धोरण ठरविणे

मंत्रिमंडळाकडून सर्व राज्यकारभार चालविला जात असल्यामुळे प्रशासनाशी सुसंगत असे धोरण ठरविण्याचे कार्य मंत्रिमंडळास करावे लागते. देशाच्या विकासासाठी व जनतेच्या समस्या सोडविण्यासाठी निश्चित ध्येयधोरणे ठरविण्याची जबाबदारी मंत्रिमंडळाची असते.

### धोरणांची अंमलबजावणी करणे

ठरविलेल्या धोरणाप्रमाणे त्या धोरणांची अंमलबजावणी मंत्रिमंडळास करावी लागते. प्रत्येक मंत्री आपआपल्या खात्याच्या योजना आखतो व त्या यशस्वीपणे राबवितो.

### आर्थिक व्यवहार

देशाच्या आर्थिक व्यवहारांची जबाबदारी मंत्रिमंडळाची असते. देशाच्या उत्पन्नाच्या व खर्चाच्या बाबी अर्थमंत्रालयाकडून निश्चित केल्या जातात. विविध खात्यांची जमा व खर्चाची सर्व माहिती अर्थमंत्रालयाला द्यावी लागते. अंदाजपत्रक संसदेत मांडणे व ते मंजूर करून घेणे ही जबाबदारी मंत्रिमंडळाचीच असते.

### परराष्ट्र संबंध

प्रत्येक देशाचे इतर दुसऱ्या देशाशी जे संबंध प्रस्थापित होतात ते मंत्रिमंडळामार्फतच होत असतात. परराष्ट्र खात्याचे मंत्री इतर देशांशी तह, करार करत असतात. संरक्षण खात्याचे मंत्री देशाच्या सीमा सुरक्षित ठेवण्याचे काम करतात.

### इतर कार्ये

या सर्व कार्याशिवाय विविध घटनात्मक व प्रशासन पदावरील नियुक्त्या जरी राष्ट्रपती करत असले तरी या सर्व नियुक्त्या मंत्रिमंडळाच्या सल्ल्याप्रमाणेच होत असतात. देशांतर्गत व देशबाह्य सर्व प्रकारच्या कार्याची जबाबदारी मंत्रिमंडळाचीच असते.

## • घटक राज्य कार्यकारी मंडळ

केंद्राप्रमाणेच घटक राज्याच्या पातळीवर कार्यकारी मंडळ असते. घटक राज्याचे कार्यकारी मंडळ राज्यपाल, मुख्यमंत्री व मंत्रिमंडळ यांनी मिळून बनते. राज्यपाल हे घटनात्मक व नामधारी असून मुख्यमंत्री व मंत्रिमंडळ हे वास्तविक प्रमुख आहेत व ते विधानसभेला जबाबदार असतात. घटक राज्यातही कॅबिनेट मंत्री, राज्यमंत्री व उपमंत्री असे तीन मंत्र्यांचे स्तर असतात.

## • राज्यपाल

राज्यपाल हे घटक राज्याचे घटनात्मक व नामधारी प्रमुख असतात. मुख्यमंत्री व मंत्रिमंडळाच्या सल्ल्याने राष्ट्रपतींकडून घटक राज्यात राज्यपालांची नेमणूक केली जाते. प्रत्येक घटक राज्यासाठी एक राज्यपाल असतो.

### पात्रतेच्या अटी:

१. ती व्यक्ती भारताची नागरिक असावी.

२. वय वर्ष ३५ पूर्ण असावी.

३. ती व्यक्ती सरकारी नोकरीत असता कामा नये.

४. संसदेने वेळोवेळी निश्चित केलेल्या अटींची पूर्तता केलेली असावी.

## कार्यकाळ:

राज्यपालांचा कार्यकाळ हा पाच वर्षांचा असतो. त्यापूर्वी राष्ट्रपती त्यांना पदावरून दूर करू शकतात म्हणजे राष्ट्रपतींची मर्जी असेपर्यंत ते पदावर राहतात. राज्यपाल स्वतःहूने आपल्या पदाचा राजीनामा देऊ शकतात.

## राज्यपालः अधिकार व कार्ये

## नेमणुकीचा अधिकार

मुख्यमंत्री व मंत्रिमंडळ, महाधिवक्ता, राज्य लोकसेवा आयोगाचे अध्यक्ष व सदस्य व विधानपरिषदेवर १/६ सदस्य यांच्या नेमणुका राज्यपाल करतात.

## कायदेविषयक अधिकार

राज्यपाल हे कायदेमंडळाचा एक महत्त्वाचा भाग आहेत. राज्यपालांच्या स्वाक्षरीशिवाय विधेयकाचे कायद्यात रूपांतर होऊ शकत नाही. राज्यपालांना कायदेविषयक बाबतीत पुढील जबाबदाऱ्या पार पाडाव्या लागतात.

**१) विधिमंडळाचे अधिवेशन बोलाविणे, तहकूब करणे, विधानसभा बरखास्त करणे.**

**२) विधानसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीनंतर पहिल्या अधिवेशनात अभिभाषण करणे.**

**३) विधिमंडळाने संमत केलेल्या विधेयकास संमती देणे अथवा नाकारणे.**

**४) विधेयक विधिमंडळाकडे परत पाठविणे किंवा राष्ट्रपतींकडे पाठविणे.**

**५) विधिमंडळाचे अधिवेशन चालू नसताना जर कायद्याची आवश्यकता भासली, तर वटहुकूम काढू शकतात.**

## आर्थिक अधिकार

अर्थविधेयकासाठी किंवा अंदाजपत्रकासाठी राज्यपालांची पूर्वसंमती आवश्यक असते. राज्यपालांच्या संमतीशिवाय अर्थविधेयक सभागृहात मांडता येत नाही. राज्याच्या आकस्मिक निधीवर राज्यपालांचे नियंत्रण असते.

## न्यायविषयक अधिकार

उच्च न्यायालयातील न्यायधीशांच्या नेमणुकांसाठी राज्यपालांचा सल्ला घेतला जातो. दुय्यम न्यायालयातील न्यायाधीशांच्या नेमणुका राज्यपाल करत असतात. याशिवाय उच्च न्यायालयाने दिलेली शिक्षा माफ करण्याचा किंवा आहे तशीच ठेवण्याचा अधिकार राज्यपालांना आहे.

## आणीबाणीविषयक अधिकार

कलम ३५६ नुसार घटक राज्यात घटनात्मक आणीबाणी लागू करण्यासाठी राज्यपाल राष्ट्रपतींना शिफारस करू शकतात. घटक राज्याची आणीबाणी लागू झाल्यास राज्यांतर्गत कारभारावर राज्यपालांचे नियंत्रण येते.

## विवेकाधिकार

राज्यपाल हे मुख्यमंत्र्यांच्या सल्ल्याने राज्यकारभार करतात. मात्र राज्यपालांकडे असे काही अधिकार आहेत जे वापरताना राज्यपालांना

**स्वविवेकाधिकाराचा वापर करावा लागतो. पुढील बाबतीत राज्यपालांना विवेकाधिकाराचा वापर करावा लागतो.**

**राष्ट्रपती राजवट**

**मुख्यमंत्र्याची नेमणूक**

**अधिवेशन बोलविणे**

**नकाराधिकार**

**विधानसभा बरखास्ती**

**बहुमत तपासणे**

**राज्यपालांची भूमिका**

घटक राज्याचा संपूर्ण राज्यकारभार राज्यपालांच्या नावे चालतो. मात्र ते नामधारी प्रमुख असतात. प्रत्यक्षात मुख्यमंत्री व मंत्रिमंडळ हेच राज्यकारभार पाहत असतात. केंद्र आणि राज्य यांच्यातील दुवा म्हणून राज्यपालांना भूमिका बजावावी लागते. १९६७ सालापर्यंत राज्यपालांना आपले अधिकार वापरण्याची वेळच आली नाही. १९६७ सालानंतर भारताच्या राजकारणात बदल होऊ लागल्याने राज्यपालांना स्वेच्छाधिकार वापरता येऊ लागला; पण स्वातंत्र्यानंतरच्या बऱ्याच मोठ्या कालखंडात राज्यपाल हे पद बऱ्याचदा वादग्रस्त राहिले. राज्यपालांनी आपल्या अधिकाराचा वापर करण्याऐवजी राजकीय हेतूने हस्तक्षेप केल्याचे दिसून आले. राज्यपाल आपल्या पदाला साजेशी भूमिका साकारू शकले नाहीत.

- ## मुख्यमंत्री आणि मंत्रिमंडळ

राज्यपालांना त्यांच्या कार्यात मदत आणि सहकार्य करण्यासाठी मुख्यमंत्री आणि मंत्रिमंडळ असेल. मुख्यमंत्री आणि मंत्रिमंडळ हे कार्यकारी मंडळाचे वास्तविक प्रमुख असतात.

- ## मुख्यमंत्री

विधानसभेत बहुमत असलेल्या पक्षाच्या किंवा गटाच्या नेत्याची राज्यपाल मुख्यमंत्री म्हणून निवड करतात.

### कार्यकाळ

मुख्यमंत्र्यांचा कार्यकाळ हा पाच वर्षांचा असतो. राज्यपालांची मर्जी असेपर्यंत मुख्यमंत्री आपल्या पदावर राहतात. तत्पूर्वी विधानसभेने अविश्वास दाखविल्यास मुख्यमंत्र्यांना राजीनामा द्यावा लागतो.

- ## मुख्यमंत्र्यांचे अधिकार व कार्य

### विधिमंडळाचा/सत्तारूढ पक्षाचा / सरकारचा नेता

मुख्यमंत्री हे घटक राज्याच्या विधिमंडळाचे नेते असतात. विधिमंडळाचे अधिवेशन बोलविणे, स्थगित करणे, अथवा बरखास्त करणे याबाबत निर्णय मुख्यमंत्री घेत असतात. सत्तारूढ पक्षाची धोरणे ठरविणे, कार्यक्रम राबविणे, पक्षाशी संबंधित कार्य मुख्यमंत्र्यांना करावी लागतात. मुख्यमंत्री हे घटक राज्याचे वास्तविक प्रमुख असल्याने विरोधकांनी विचारलेल्या सर्व प्रश्नांची उत्तरे मुख्यमंत्र्यांना द्यावी लागतात. सरकारशी संबंधित शासन व प्रशासनाची सर्व जबाबदारी मुख्यमंत्र्यांची असते.

## राज्यपाल व मंत्रिमंडळ यांच्यातील दुवा

मुख्यमंत्री हे राज्यपाल व मंत्रिमंडळ यांच्यातील दुवा म्हणून ओळखले जातात. राज्याच्या प्रशासनाबाबतचे सर्व निर्णय राज्यपालांना कळविणे व राज्यपालांचा निर्णय व सल्ला मंत्रिमंडळाला कळविणे हे दुहेरी कार्य मुख्यमंत्र्यांना करावे लागते.

## मंत्रिमंडळाची निर्मिती

मुख्यमंत्र्यांच्या शिफारशीने इतर मंत्र्यांची नेमणूक राज्यपाल करत असतात. सरकार चालविण्यासाठी आवश्यक असलेल्या व सहमती असलेल्या मंत्र्यांची यादी मुख्यमंत्री राज्यपालांना सादर करतात व राज्यपाल या सदस्यांना मंत्री म्हणून शपथ देतात.

## मंत्रिमंडळाशी संबंधित कार्य

मंत्रिमंडळातील सदस्यांना खाते वाटप करणे, खात्यांचे फेरबदल करणे, खाते काढून घेणे हे कार्य मुख्यमंत्र्यांना करावे लागते. मंत्रिमंडळात समन्वय ठेवणे, मंत्रिमंडळाचे घेतलेले निर्णय राज्यपालांना कळविणे हेही काम मुख्यमंत्र्यांना करावे लागते. मंत्र्यांवर नियंत्रण ठेवणे, देखरेख करणे, मंत्र्यांना मार्गदर्शन करणे ही सर्व कामे मुख्यमंत्र्यांना करावी लागतात. मंत्रिमंडळाच्या बैठकींचे अध्यक्षस्थान भूषविणे.

## केंद्र आणि राज्य यातील दुवा

भारतात संसदीय शासन पद्धतीबरोबरच संघराज्य शासन पद्धतीदेखील आहे. या पद्धतीत मध्यवर्ती स्तरावर केंद्र आणि प्रादेशिक स्तरावर घटक राज्ये शासन असतात. केंद्राचे घटक राज्यावर नियंत्रण असते. केंद्राला अनुसरूनच राज्यांनी कारभार करावा. पंतप्रधान आणि घटक राज्यांचे मुख्यमंत्री यांच्यात नेहमी संपर्क असतो.

## नेमणुकीचे अधिकार

विविध समित्या, आयोग, प्रशासकीय महामंडळांवरील नियुक्त्या करण्याचा अधिकार मुख्यमंत्र्यांना असतो.

## जनतेचे नेते

मुख्यमंत्री हे घटक राज्यातील जनतेचे नेते असतात. जनतेचे सर्व प्रश्न व समस्या सोडविण्याची जबाबदारी मुख्यमंत्र्यांचीच असते. राज्यातील घडणाऱ्या घटना आणि प्रसंगांबद्दल मुख्यमंत्र्यांना जबाबदार धरले जाते. घटक राज्याची सर्वांगीण जबाबदारी मुख्यमंत्र्यांची असते.

## मंत्रीमंडळ

केंद्राप्रमाणे घटक राज्यांतही कॅबिनेट मंत्री, राज्यमंत्री व उपमंत्री असतात. मंत्रिमंडळ हे विधिमंडळाला जबाबदार असते. मुख्यमंत्र्यानंतर सर्वांत वरच्या स्तरावर कॅबिनेट मंत्री असतात, त्यानंतर राज्यमंत्री असतात आणि आवश्यकता असेल, तर उपमंत्रीही असतात. सर्वांत शेवटी संबंधित खात्याचे सचिव असतात. मंत्र्यांचा कार्यकाळ हा मुख्यमंत्र्यांच्या मर्जीवर अवलंबून असतो. मंत्र्यांच्या खात्यात फेरबदल मुख्यमंत्री करू शकतात. मंत्रिमंडळातील सदस्य हे कोणत्याही एका सभागृहाचे सदस्य असावे लागतात. मंत्रिमंडळात सामूहिक जबाबदारी, संयुक्त जबाबदारी, गुप्तता, एकवाक्यता, समन्वय असतो.

## मंत्रिमंडळाची मुदत

विधिमंडळाचा विश्वास असेपर्यंत मंत्रिमंडळ आपल्या पदावर राहते. विधिमंडळाने मंत्रिमंडळावर अविश्वास व्यक्त केल्यास मंत्रिमंडळाला राजीनामा द्यावा लागतो. तसेच मुख्यमंत्र्यांनी राजीनामा दिला, तर मंत्रिमंडळाचा राजीनामा समजला जातो.
मंत्रिमंडळाचे अधिकार व कार्ये

## १) कायदेविषयक अधिकार

वास्तविक प्रमुख असल्यामुळे मंत्रिमंडळाला कायदेनिर्मिती करावी लागते. विधिमंडळात बहुतांश विधेयके ही मंत्रिमंडळाकडून सादर केली जातात व ती विधेयके पास करून घेण्याचे कार्य मंत्रिमंडळ करत असते. आखलेल्या धोरणांशी सुसंगत असे कायदे तयार करण्याची जबाबदारी मंत्रिमंडळाचीच असते. राज्य सूचीतील विषयासंबंधी कायदे करण्याचा अधिकार मंत्रिमंडळाला आहे.

## २) धोरण ठरविणे

मंत्रिमंडळाकडून सर्व राज्यकारभार चालविला जात असल्यामुळे प्रशासनाशी सुसंगत असे धोरण ठरविण्याचे कार्य मंत्रिमंडळास करावे लागते. देशाच्या विकासासाठी व जनतेच्या समस्या सोडविण्यासाठी निश्चित ध्येयधोरणे ठरविण्याची जबाबदारी मंत्रिमंडळाची असते.

## ३) धोरणांची अंमलबजावणी करणे

ठरविलेल्या धोरणाप्रमाणे त्या धोरणांची अंमलबजावणी मंत्रिमंडळास करावी लागते. प्रत्येक मंत्री आपआपल्या खात्याच्या योजना आखतो व त्या यशस्वीपणे राबवितो.

## ४) आर्थिक अधिकार

राज्याच्या आर्थिक व्यवहारांची जबाबदारी मंत्रिमंडळाची असते. राज्याच्या उत्पन्नाच्या व खर्चाच्या बाबी अर्थमंत्रालयाकडून निश्चित केल्या जातात. विविध खात्यांची जमा व खर्चाची सर्व माहिती अर्थमंत्रालयाला द्यावी लागते. अंदाजपत्रक विधिमंडळात मांडणे व ते मंजूर करून घेणे ही जबाबदारी मंत्रिमंडळाचीच असते.

## ५) नेमणुकीचे अधिकार

विविध घटनात्मक व प्रशासन पदावरील नियुक्त्या जरी राज्यपाल करत असले तरी या सर्व नियुक्त्या मंत्रिमंडळाच्या सल्ल्याप्रमाणेच होत असतात.

# सारांश

देशाचा राज्यकारभार चालविणारे कार्यकारी मंडळ हे स्थान महत्त्वाचे असते. संसदीय लोकशाही शासन प्रकारात नामधारी आणि वास्तविक असे कार्यकारी मंडळाचे दोन प्रकार असतात. प्रत्यक्षात वास्तविक कार्यकारी प्रमुख हेच राज्यकारभार चालवितात. केंद्रीय स्तरावर पंतप्रधान व त्यांचे मंत्रिमंडळ वास्तविक कार्यकारी प्रमुख असतात. राष्ट्रपती हे नामधारी कार्यकारी प्रमुख असतात. घटक राज्यातही याच प्रकारची व्यवस्था असते. मुख्यमंत्री व त्यांचे मंत्रिमंडळ हे वास्तविक कार्यकारी प्रमुख असून राज्यपाल हे नामधारी कार्यकारी प्रमुख असतात. कायदे करणे, धोरण ठरविणे, धोरणाची अंमलबजावणी करणे, आर्थिक व्यवहार पाहणे, महत्त्वाच्या पदावरील नियुक्त्या करणे आणि अंतिमतः जनतेला जबाबदार असणे या प्रकारची भूमिका कार्यकारी मंडळ पार पाडते.